# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 23/09/2017

<u>प्रेस नोट</u>

## "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे"- विशेष पोलीस अधिकाऱ्यांची भावना.



पोलीस समाजासाठी आवश्यक असणारा परंतु बहुतांश जणांचा नावडता घटक. वर्षानुवर्षे चित्रपट व इतर माध्यमांतून पोलिसांची भूमिका बहुतेक करून विनोदी अथवा खलनायकी दाखविल्याचे परिणामामुळे व पोलीस दलांतील काही मोजक्या पोलिसांच्या गैरकृत्यामुळे ही नावडतेपणाची भावना अधिक वाढीस लागते. अर्थात 'उडदा माजी काळे गोरे' या म्हणीप्रमाणे समाजातील कोणताही घटक परिपूर्ण नाही. प्रत्येक

ठिकाणी काही कुप्रवृत्ती असल्याचे दिसून येते. परंतु, मागील काही दिवसांपासून औरंगाबाद शहरात पोलीसांप्रतीची जनभावना बदलतांना दिसत आहे आणि यास कारण आहेत औरंगाबाद शहराचे पोलीस आयुक्त श्री यशस्वी यादव यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेतून रिफ्लेक्टर जॅकेट, लाठी, शिट्टी असे वेषात शहरातील विविध भागात पोलिसांसह काम करणारे **'विशेष पोलीस अधिकारी.'**

गणेश उत्सव व बकरी ईदचे बंदोबस्ताचे मुहूर्तावर पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी 1100 विशेष पोलीस अधिकारी यांची नेमणूक केली. शहरात फेरफटका मारल्यास अनेक विशेष पोलीस अधिकारी त्यांना नेमून दिलेली कामे अत्यंत उत्साहाने पार पाडीत असल्याचे दिसत आहे.

"मैने इससे पहलेभी पुलिस के साथ काम किया है लेकीन 'विशेष पोलीस अधिकारी' बनकर काम करते हुये एक अलग जिम्मेदारी का एहसास हो रहा है । गणपती और बकरी ईद के बंदोबस्त मे काम किया । पुलिस के साथ सवेरे 9 बजे से रात 11 बाजे तक काम करते वक्त पुलिस किन मुश्कील हालात में काम करते है, यह देखने को मिला । बंदोबस्तमे काम करते वक्त भूक से बेहाल होने कें बाद मिला पुरीभाजी का फुड पॉकेट, मुझे किसी पक्वान जैसा लगा और भुके पेट पुलिस कैसे काम करते है ईस बात का अनुभव हुआ " असे बोलके मनोगत टाऊन हॉल परिसरातील विशेष पोलीस अधिकारी सय्यद साबेर यांनी व्यक्त केले.

सिटीचौक परिसरातील विशेष पोलीस अधिकारी ॲडव्होकेट अंजली कापसे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करतांना सांगितले कि "पोलीस अधिकारी होण्याची इच्छा विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक झाल्याने पूर्ण झाली. समाजाचे ऋण फेडण्याची हि एक संधी असून त्याबद्दल औरंगाबाद पोलिसांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत."

औरंगाबाद शहर हळूहळू मेट्रो शहर म्हणून विकसित होत आहे. 18 लाख लोकसंख्या असलेल्या शहरासाठी पोलिसांची संख्या आहे साडे-

तीन हजार. वाढती लोकसंख्या नवनवीन वस्त्या, वाढती गुन्हेगारी, गुन्हे करण्याच्या नवनवीन पद्धती, कायदा-सुव्यवस्थेचे प्रसंग या बदलत्या परिस्थितीत उपलब्ध पोलिसांच्या संख्येवर काम करण्याची जबाबदारी पोलीस आयुक्तालयावर आहे.

पोलीस उपायुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली धाटे -घाडगे यांचे मते "शहराच्या वाढत्या व्यापानुसार पोलिसांचे मनुष्यबळ वृद्धीवर मर्यादा आहेत. ही बाब हेरून पोलीस आयुक्तांनी 'विशेष पोलीस अधिकारी' नेमण्याची योजना हाती घेतली. यामुळे पोलिसांवरील ताण निश्चितच कमी होत आहे. शहरातल्या कानाकोपऱ्यात आता पोलिसांचे दूत कार्यरत झाल्यामुळे गुन्हेगार व समाजकंटकाच्या हालचालीची माहिती मिळवण्याचे पोलिसांचे स्त्रोत वाढले आहेत."

**<u>महाराष्ट्र पोलीस कायद्याचा आधार</u>**

विशेष पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक महाराष्ट्र पोलीस कायद्याचे आधारे पोलीस आयुक्तांना प्राप्त अधिकारान्वये करण्यात आलेली आहे. विशेष पोलीस अधिकारी पदाकरिता 18,000 आवेदन अर्ज प्राप्त झाले असून पहिल्या टप्प्यात 1100 विशेष पोलीस अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. पोलीस दलाकरीता आठवड्याला 12 तास काम करण्याची तयारी , शारीरिक क्षमता व स्वच्छ चारित्र्य केवळ एवढ्याच अटी विशेष पोलीस अधिकारी पदासाठी ठेवण्यात आल्या आहेत. विशेष पोलीस अधिकाऱ्यांचा उत्साह पाहता लवकरच विशेष पोलीस अधिकारी भरतीचा पुढील टप्पा अपेक्षित आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी **मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी विशेष पोलीस अधिकाऱ्यांना शुभेच्छा देताना औरंगाबाद पोलीस आयुक्तांचे कौतुक करून विशेष पोलीस अधिकारी योजना इतर घटकांसाठी दिशादर्शक ठरेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

विशेष पोलीस अधिकाऱ्यांमुळे औरंगाबाद पोलीस दलाची शक्ती वृद्धींगत झाली असून **'कॅम्युनीटी पोलिसिंग'** चा हा अभिनव प्रयोग यशस्वी ठरला आहे.

राजाबाजार येथील विशेष पोलीस अधिकारी राजू पिंपळे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, "विशेष पोलीस अधिकारी म्हणून काम करतांना नागरिक म्हणून आपल्या चुका लक्षात येत आहेत. आता मोटारसायकलवर ट्रिपल सीट जाण्याची किंवा सिग्नल जंप करण्याची लाज वाटते. विशेष पोलीस अधिकारी झाल्यापासून कायद्याचे रक्षण करणे जरी पोलिसांची जबाबदारी असली तरी कायद्याचे पालन करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे याची जाणीव होत आहे."

एकंदरीत, विशेष पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया पाहता विशेष पोलीस अधिकारी अत्यंत उत्साहाने कार्य करत असून पोलीस दलाशी नागरिकांचा हा नवा प्रत्यक्ष सुसंवाद औरंगाबाद शहरास एक सजग व सुरक्षित शहर म्हणून विकसित करण्यास हातभार लावणार आहे, यात कसलीही शंका नाही.

स्वाक्षरीत/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर